<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.१</u>

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की**

<u>नि.फौ.ख.क्र.३२५/२०२१</u>
सरकार विरूध्द सचिन
निशाणी – २२

**माझे नाव – अक्षय मनोहर राजगिरे**
**वय – अंदाजे ३० वर्ष, व्यवसाय – पानठेला**
**राहणार – राम मंदरी चौक, कामठी.**

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. लुले यांच्या कडून**

दि. १२.०५.२०२१ रोजी पोलीसांनी मला घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याकरीता बोलविले नव्हते. पोलीसांनी माझ्या समक्ष काहीही जप्त केले नाही. पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला नाही.

आता मला घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर अनुक्रमांक १ कडे माझी सही आहे. त्यातील मजकूर माहिती नाही. सहीस **<u>निशाणी २३</u>** देण्यात येते.

**(साक्षीदार हा त्याच्या पूर्वीच्या जबाबाप्रमाणे कथन करीत नसल्यामुळे त्यास सहाय्यक सरकारी अभियोक्तांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)**

हे म्हणणे खरे नाही की दिनांक १२.०५.२०२१ रोजी पोलीसांनी माझे समक्ष लिहगाव नागपूर–जबलपूर सर्विस रोड वर कोथुराना घाट कामठी येथे घटनास्थळ पंचनामा केला व ६ ब्रास रेती व अशोक लेलँडचा टिप्पर जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की तो पंचनामा मला वाचून दाखविला व तो बरोबर असल्याने मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला वाचविण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. कोठारी यांचा पुकारा केला असता गैरहजर. आरोपींनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपासणी नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2026.04.22 16:28:33 +0530

कामठी
दिनांक २२/०४/२०२६

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी